# वसई-विरार शहर महानगरपालिका

## महिला व बालकल्याण विभाग

## मुख्य कार्यालय, विरार

जावक.क्र./व.वि.श.म/म.बा.क.स/५५१/२०२३
दिनांक : २२/१२/२०२३

### जाहीर सुचना

**वसई-विरार शहर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागाच्या विविध योजनांची अर्ज घेण्याची मुदत २८ फेब्रुवारी, २०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे. तरी महिला व बालकल्याण विभागातील विविध योजनांचा लाभ नागरिकांनी घ्यावा - मा.आयुक्त तथा प्रशासक, वसई-विरार शहर महानगरपालिका यांचे आवाहन**

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत महानगरपालिका हद्यीतील गरीब व गरजूंना अनेक योजना मंजुर केल्या आहेत. यामध्ये **विद्यावर्धीनी शैक्षणिक** योजनेअंतर्गत विधवा/निराधार/घटस्फोटीत/परितकत्या महिलांच्या मुली व मुले, निराधार बालके, दिव्यांग, कर्णबधीर व मुकबधीर मुले व मुली, एच.आय.व्ही बाधीत पालकांच्या मुलांना, ज्या महिलेचे पती व्याधीग्रस्त असून अंथरुणास खिळलेले आहेत अशा महिलांच्या मुलांना तसेच अनाथ निराश्रीत बालकांना शैक्षणिक अर्थसहाय्य दिले जाते. तसेच **कोवीड-१९** मध्ये आई किंवा वडील मयत झालेल्या पालकांच्या मुले व मुलींना शैक्षणिक अर्थसहाय्य दिले जाते.

याचबरोबर **आधारमाया** योजनेअंतर्गत कुष्ठरोग बाधीत पुरूष व महिला, मुले व मुली तसेच ६० वर्षावरील एकाकी ज्येष्ठ महिलांच्या उपजिविकेकरिता मासिक अनुदान, **उत्तरदायी** योजनेअंतर्गत गतीमंद, मतिमंद मुलांच्या देखभालीकरिता मासिक अनुदान, **सुखदायिनी** योजनेअंतर्गत कुटुंब प्रमुख ७५ टक्के अथवा त्याहून अधिक दिव्यांग असणाऱ्याच्या १४ वर्षाखालील मुलांना व सर्व वयोगटातील मुली व महिलांना मासिक अनुदान दिले जात आहे.

महिला, युवक व युवती, ज्येष्ठ पुरूष यांच्या डायलेसीस उपचाराकरिता **जिवनदायीनी** योजनेअंतर्गत प्रति खेप आर्थिक सहाय्य व कर्करोग बाधीत महिलांच्या उपचाराकरिता देखील वैद्यकिय सहाय्य, महिलांना मेमोग्राफी तपासणीकरिता व पॅप स्मीअर तपासणीकरिता अर्थसहाय्य महानगरपालिकेमार्फत देण्यांत येते.**वरदायिनी** योजनेअंतर्गत निराधार, विधवा महिलेच्या मुली व ज्या मुलींचे आई - वडील दिव्यांग आहेत त्या मुलीच्या तसेच अंध,अपंग मुली व अनाथ/निराधार मुलींच्या लग्नाकरिता आर्थिक अनुदान, त्याचबरोबर **दत्तक** योजनेअंतर्गत मुला - मुलींना दत्तक घेतल्यास देखील महानगरपालिकेमार्फत प्रोत्साहान पर आर्थिक सहाय्य देण्यांत येते. तसेच **श्रमसाधना** योजनेअंतर्गत ४५% ते ७५% दरम्यान अंधत्व व अपंगत्व असलेल्या महिलांना स्वयंरोजगाराकरिता अर्थसहाय्य,१८ ते २१ वयोगटातील अनाथ मुला/ मुलींना उपजिविकेसाठी अर्थसहाय्य.

या सर्व योजनांची महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत दैनंदिन अंमलबजावणी सुरू असून,याबाबतची नियमावली व लाभार्थी नमूना फॉर्म महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग समिती कार्यालयात (महिला व बालकल्याण विभागात) व महानगरपालिकेच्या www.vvcmc.in या वेबसाईट वर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.महिला व बालकल्याण विभागाच्या या योजनांसाठी अर्ज सादर करण्याची मुदत २८ फेब्रुवारी, २०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे. तरी महानगरपालिका हद्यीतील नागरिकांनी या योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन मा.आयुक्त तथा प्रशासक श्री.अनिलकुमार पवार (भा.प्र.से) यांनी केले आहे.

**महिला व बालकल्याण विभाग**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**